# ४. संविधानिक शासन

**प्र.१ अ ) दिलेल्या प्रतयांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा:**
1) **<u>युनिटेड किंग्ड्म</u>** या देशाचे संविधान अलिखित आहे.
2) संसदीय पद्धतीमध्ये कायदेमंडळ व कार्यकारी मंडळात अधिकारांचे **<u>समन्वय</u>** आहे.
3) अमेरिकन संविधानाच्या प्रथम दहा दुरुस्त्यांना एकत्रितपणे **<u>बिल ऑफ राईड्स</u>** सबोधले जाते.

**ब ) चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा :**
१) मॅग्ना कार्टा – इंग्लंड
२) नकाराधिकार – युनायटेड किंग्डम
३) केशवानंतर – संविधनाची मूळ चौकट.
**उत्तर : नकाराधिकर – <u>अमेरिका</u>**

क) गटात न बसणारा शब्द ओळखा :
१) इंग्लंड, स्कॉटलंड, वेल्स, प्रजासत्ताक आयर्लंड
उत्तर : **प्रजासत्ताक आयर्लंड**

२) भारत, ऑस्ट्रेलिया, कॅनडा, अर्जेंतींना
उत्तर : **अर्जेंतींना**

**प्र.२ पुढील विधाने चूक की बरोबर ते सकारण स्पष्ट करा :**

**(१) भारतीय संघराज्याला संघराज्यसदृश संघराज्य म्हटले जाते.**
**उत्तर :** हे विधान **बरोबर** आहे.
कारण : भारतीय संविधानाच्या सातव्या परिशिष्टात करण्यात आलेल्या अधिकार विभागणीत केंद्र शासनाला अधिक अधिकार देण्यात आले आहेत.

**(२) अमेरिकेत संसदीय शासनपद्धती अस्तित्वात आहे.**
**उत्तर :** हे विधान **चूक** आहे.
कारण : अमेरिकेतील अध्यक्षीय शासनपद्धती अस्तित्वात आहे.

**प्र. ३ सहसंबंध स्पष्ट करा :**

**(१) संसदीय शासनप्रणालीतील कायदेमंडळ व कार्यकारी मंडळ.**

**उत्तर :** (१) संसदीय शासन प्रणालीत कायदेमंडळात ज्या पक्षाला बहुमत प्राप्त होत असते, त्या पक्षाचे सरकार सत्तेवर येते.
(२) मंत्रिमंडळाचे सदस्य कायदेमंडळाचे सदस्य असतात.
(३) कायदेमंडळाच्या कामकाजात मंत्रिमंडळ सहभागी होत असते.
(४) कायदेमंडळ व कार्यकारी मंडळात समन्वय असतो.
(५) मंत्रिमंडळ कायदेमंडळाला संयुक्तपणे जबाबदार असते.
(६) कायदेमंडळ बहुमताने अविश्वासाचा ठराव संमत करून मंत्रिमंडळास अधिकारावरून काढून टाकू शकते.

**(२) अध्यक्षीय शासनप्रणालीत अध्यक्ष व मंत्रिमंडळ.**
**उत्तर :** (१) अध्यक्षीय शासनप्रणालीत राष्ट्राध्यक्ष हाच शासनप्रमुख असतो.
(२) अध्यक्ष आपल्या इच्छेनुसार त्याच्या सल्लागारांची मंत्रिमंडळाची नेमणूक करू शकतो.
(३) अध्यक्ष व त्याच्या मंत्रिमंडळाचे सदस्य कायदेमंडळाचे सदस्य नसतात.
(४) मंत्रिमंडळाचे सदस्य अध्यक्षाचे केवळ सल्लागार असतात. ते अध्यक्षाची मर्जी असेपर्यंत अधिकार पदावर राहू शकतात.
(५) संविधानाने राज्यकारभारविषयक अधिकार राष्ट्राध्यक्षास दिले असल्याने तो आपल्या मर्जीप्रमाणे निर्णय घेऊ शकतो.

**प्र. ४ पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा :**
**(१) संविधानवाद आणि संवैधानिक नैतिकता या संकल्पना स्पष्ट करा.**

**उत्तर : (अ) संविधानवाद :** संविधानवाद म्हणजे शासनाचे अधिकार मर्यादित असणे. शासनाच्या अधिकारांवरील मर्यादा संविधानात नमूद केलेल्या असतात किंवा त्या परंपरेने प्रस्थापित झालेल्या असतात. म्हणून त्यास घटनात्मक शासन (Constitutional Government) असे म्हणतात.

निरंकुश राज्यकर्त्या कडून होणाऱ्या अधिकारांच्या गैरवापराची प्रतिक्रिया म्हणून संविधानवादाचा विचार ब्रिटिश विचारवंत जॉन लॉक याने त्याच्या सामाजिक कराराच्या सिद्धांत मांडला.

सन १६८९ च्या बिल ऑफ राइट्स प्रमाणे राजाच्या सत्तेवर अनेक निबंध लादले गेले होते. १८व्या शतकात मॉंटेस्क्यू या फ्रेंच विचारवंताने सत्ताविभाजनाचा सिद्धांत मांडला आणि त्यात शासनाच्या तीन घटक संस्थांमध्ये अधिकारांचे विभाजन करून शासनावर नियंत्रण प्रस्थापित करण्याचा विचार, म्हणजेच संविधानवाद ही संकल्पना मांडण्यात आली.

अमेरिकेच्या संविधानात सत्ताविभाजनाच्या सिद्धांताची कार्यवाही करण्यात आली. म्हणजेच आधुनिक संविधानवाद प्रत्यक्षात साकारण्यात आला. अमेरिकेच्या संविधानातील पहिल्या दहा दुरुस्त्यांना एकत्रितपणे बिल ऑफ राइट्स म्हणतात. त्याद्वारा शासनाने नागरिकांच्या स्वातंत्र्यावर बंधने घालण्यास प्रतिबंध करण्यात आला.
अशा प्रकारे शासनसंस्थेच्या अधिकारांवर नियंत्रण प्रस्थापित करण्यात आले.

लोकशाही शासनप्रणाली असलेल्या इंग्लंड आणि भारतात संसदेच्या सार्वभौमत्व वर अशाच प्रकारची नियंत्रणे प्रस्थापित करण्यात आली. भारतातील केशवानंद भारती विरुद्ध भारत सरकार या प्रसिद्ध खटल्यात १९७३ साली सर्वोच्च न्यायालयाने संविधानाची मूळ चौकट घटनादुरुस्तीद्वारा बदलता येणार नाही असे घोषित केले. म्हणजेच
संसदेच्या घटनादुरुस्तीच्या अधिकारावर नियंत्रण प्रस्थापित केले.

**(ब) संवैधानिक नैतिकता :** लोकशाहीमध्ये
संविधानवाद म्हणजे केवळ शासनाच्या अधिकारांवर नियंत्रण इतपत सीमित नाही. त्याच्यापुढे जाऊन संविधानाच्या भावनेचे (Spirit of Constitution) आदर करणे, म्हणजेच संवैधानिक नैतिकतेचे तत्त्व पुढे आले. त्यानुसार राज्यकर्त्यांनी संविधानाच्या आधारभूत तत्त्वांचे पालन केले पाहिजे, असे प्रतिपादन करण्यात येते.

**(२) भारतीय संघराज्याचे स्वरूप स्पष्ट करा.**
**उत्तर :** (१) भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाले तेव्हा भारतात एकात्म शासनपद्धती प्रचलित होती. भारताच्या संविधान कारांनी अस्तित्वात असलेल्या प्रांतांना घटकराज्यांचा दर्जा बहाल केला. म्हणजेच केंद्रोत्सारी पद्धतीने संघराज्याची स्थापना केली.

(२) भारतीय संविधानात मध्यवर्ती स्तरावर केंद्र शासन आणि नव्याने अस्तित्वात आलेल्या प्रादेशिक घटकांसाठी राज्य शासन अशी द्विस्तरीय रचना करण्यात आली आहे.
(३) संविधानात भारताचे वर्णन राज्यांचा संघ Union of States असे करण्यात आले आहे. त्याअंतर्गत केंद्र शासन, २९ राज्य सरकारे व ७ केंद्रशासित प्रदेश यांचा संघ असे भारतीय संघराज्याचे स्वरूप आहे.
(४) भारताच्या संविधानाच्या सातव्या परिशिष्टात केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांच्यातील अधिकार विभागणी विषयक तरतुदी करण्यात आल्या आहेत. त्यानुसार (अ) केंद्रसूचीत (Union List) मध्ये ९७ विषय, राज्यसूचीत (State List) मध्ये ६६ विषय आणि समवर्ती सूचीत (Concurrent List) मध्ये ४७ विषय अशी अधिकार विभागणी करण्यात आली आहे. शेषाधिकार (Residency Powers) केंद्र सरकारकडे सोपवण्यात आले आहेत.

(५) अधिकारविभागणीत केंद्र सरकारला अधिक अधिकार देण्यात आल्याने, टीकाकार भारताचे वर्णन संघराज्यसदृश संघराज्य (Qhasi federal State) असे करतात. एकात्मतेकडे झुकणारे संघराज्य असेही भारतीय संघराज्याचे वर्णन करण्यात येते.

**प्र. ५ दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे पुढील प्रश्नाचे उत्तर सविस्तर लिहा**

**(१) संविधान आणि संविधानातील परस्परसंबंधी घटक स्पष्ट करा :**
देशाच्या राज्यकारभाराची पायाभूत तत्त्वे आणि राज्यकारभारविषयक तरतुदींना संविधान किंवा राज्यघटना असे म्हणतात. संविधान हा नियमांचा संच असतो; नागरिकांच्या अधिकारांचा संच असतो आणि उद्दिष्टे व मूल्यांचा संच असतो. जगातील सर्व देशांची संविधान, इंग्लंडचा अपवाद वगळता, लिखित स्वरूपात आहेत.

संविधान एक जिवंत दस्तऐवज असल्याने बदलत्या काळाच्या गरजेनुसार त्यात दुरुस्ती करण्यासंबंधीच्या तरतुदीही करण्यात आलेल्या असतात.

**(ब) नियमांचा संच :** सत्ताविभाजनाच्या सिद्धांतानुसार संविधानात शासकीय यंत्रणा, म्हणजेच कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायमंडळ या शासनाच्या तीन घटकसंस्थांची रचना, अधिकार आणि कार्यांसंबंधीच्या तरतुदी (नियम) करण्यात येतात. नियंत्रणआणि समतोलाच्या (Checks and Balances) सिद्धांतानुसार शासनाच्या तीन घटक संस्था एकमेकांवर नियंत्रण गाजवतात. शासनाच्या घटकसंस्थांच्या अधिकारांच्या मर्यादा संविधानात स्पष्ट करण्यात येतात.

**(क) अधिकारांचा संच :** संविधानात शासनसंस्थेच्या तीन घटकांचे अधिकार व त्यांवरील मर्यादा विशद करण्यात आलेले असतात. त्याचप्रमाणे शासक आणि शासित, राज्यकर्ते व प्रजा जन यांच्यावरील संबंधांचे विवरण करण्यात आलेले असते. त्यानुसार संविधानात नागरिकांचे मूलभूत हक्क व कर्तव्ये नमूद करण्यात आलेली असतात. मूलभूत हक्कांच्या मर्यादाही स्पष्ट करण्यात आलेल्या असतात. मूलभूत हक्कांच्या संरक्षणविषयक तरतुदीही त्यात असतात. त्यामागचा उद्देश प्रत्येक नागरिकाला स्वतंत्र, सन्मान व प्रतिष्ठेचे आयुष्य जगता यावे हा असतो.

**(ड) उद्दिष्टे व मूल्यांचा संच :** संविधानाच्या प्रारंभी उद्देशपत्रिका देण्यात आलेली असते. संविधानाच्या या सरनाम्यात / उद्देशपत्रिकेत संविधानकारांना अभिप्रेत असलेली उद्दिष्टे व मूल्ये विशद करण्यात आलेली असतात. भारताच्या संविधानाच्या उद्देशपत्रिकेत भारत हे एक सार्वभौम, प्रजासत्ताक, समाजवादी, धर्मनिरपेक्ष लोकशाही असल्याचे घोषित करण्यात आले आहे. त्यात स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुभाव या मूल्यांचा उद्‌घोष करण्यात आला आहे.